# नगर परिषद कार्यालय शेगांव, जिल्हा बुलढाणा

## ( संगणक विभाग )

## ई-निविदा प्रपत्र

जा.क्र.397 नपशो/संगवि/२०२६, दिनांक14/०५/२०२६

मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव, जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने योग्य नोंदणीकृत कंत्राटदार/उत्पादक/वितरक यांचे कडून खालील नमूद केलेल्या कामासाठी नगर परिषद अंतर्गत शेगांव शहरात सीसीटीव्ही कॅमेरे (सीसीटीव्ही सनियंत्रण यंत्रणा) चे अद्यावतीकरण करण्याबाबतच्या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदरहू ई-निविदेच्या अटी व शर्ती आणि सविस्तर निविदा सुचना https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | निविदा प्रपत्र किंमत | ई-निविदा अनामत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | नगर परिषद अंतर्गत शेगांव शहरात सीसीटीव्ही कॅमेरे (सीसीटीव्ही सनियंत्रण यंत्रणा) चे अद्यावतीकरण करण्याबाबत. | ४५३८५३८ | रु. ४६००/- | रु. ४६०००/- | १२० दिवस |

### ई-निविदा प्रक्रियेचा तपशिल

| | |
|---|---|
| ई-निविदा ऑनलाईन निविदा विक्री | दिनांक १५/०५/२०२६ सकाळी १०:०० पासुन ते दिनांक २९/०५/२०२६ सांयकाळी ५:०० वाजे पर्यंत. |
| ई-निविदा ऑनलाईन निविदा स्विकृती | दिनांक १५/०५/२०२६ सकाळी १०:०० पासुन ते दिनांक २९/०५/२०२६ सांयकाळी ५:०० वाजे पर्यंत. |
| ई-निविदा ऑनलाईन निविदा उघडणे | दिनांक ०१/०६/२०२६ शक्य झाल्यास सकाळी ११: ०० वाजता. |

**अटी व शर्ती :**

**निविदा सादर करतांना खालील प्रमाणे कागदपत्रे सोबत जोडणे बंधनकारक असेल.**

१) निविदाधारकांनी निविदा प्रपत्र शुल्क व अनामत रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा केलेली पावती स्कॅन करून अपलोडकरणे बंधनकारक राहील.

२) स्थायी निर्देश क्र.३६ मधिल अटी आणि शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहील. सोबतच त्यानुसार "परिशिष्ट-अ प्रमाणे निविदाधारकांकडुन निविदेसंदर्भात नगरसेवकांशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंध नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (500 रु च्या बन्धपत्रावर) स्कॅन करुन अपलोड करणे बंधनकारक राहील. (बंधपत्र खरेदी चा दिनांक तीन महिने पेक्षा जास्त जुना नसावा)

३) शासकीय / निमशासकीय कार्यालयाकडून कंत्राटदार काळया यादीत नसल्याबाबत

स्वयंघोषणापत्र (affidavit) किंवा शपथपत्र स्कॅनकरुन (500 रु च्या बन्धपत्रावर) अपलोड करणे बंधनकारक राहील. (बंधपत्र खरेदी चा दिनांक तीन महिने पेक्षा जास्त जुना नसावा)

४) मागील तीन आर्थिक वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

५) कंत्राटदार/ उत्पादक/ पुरवठादार नोंदणीकृत असले बाबतचे वैध प्रमाणपत्र (निविदा कालावधी मध्ये मुदत वैध असलेले)

६) GST नोंदणी चे प्रमाणपत्र

७) PAN Card/प्रमाणपत्र

८) आधार Card / प्रमाणपत्र

९) मागील तीन आर्थिक वर्षामध्ये समकक्ष काम पूर्ण केल्याचे अनुभव प्रमाणपत्र/काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. (अनुभवासाठी निविदाकाराने प्रत्यक्ष काम केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. कार्यादेश गृहीत धरले जाणार नाहीत. निविदा किमतीच्या ८०% चे एक काम किंवा निविदा किमतीच्या ५०% ची दोन कामे किंवा निविदा किमतीच्या ४०% ची तीन कामे.

१०) सविस्तर आवश्यकता प्रस्थावित डिझाईन आणि पुरवठ्याची व्याप्ती समजून घेण्यासाठी निविदाकाराने कार्यालय कामकाजाच्या वेळेनुसार साईटला भेट देणे अनिवार्य आहे. सदर कामासाठी प्रत्यक्ष Site Survey केल्याचा अहव (प्रमाणपत्र नगर परिषदे कडून जारी केलेले) तेच जोडले गेले पाहिजे. निविदा प्रपत्रात (OLINE UPLOAD केलेल्या प्रपत्रामधील) नमूद केल्याप्रमाणे नगर परिषद शेगांव येथे सादर केलेल्या नमुन्याची पोच पावती इत्यादी कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य राहील.

११) सा.बां.वि. सीएटी /२०२२.प्र.क्र.५०/ दमा-२ दि. ११ मे २०२२ नुसार निविदेसोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ठ- १) 500/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर (निविदा काळातील) कामाच्या नावासहित लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

१२) तांत्रिक लिफाफ्यामध्ये EPF नोंदणी प्रमाणपत्र, Chartered Accountant यांच्या कडून प्रमाणित केलेले मागील ३ वर्षातील Turnover प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१३) ठेकेदार उत्पादक कंपनीचा अधिकृत किंवा उत्पादक टेक्निकल सपोर्ट दाखला जोडणे बंधनकारक आहे.

**इतर अटीं व शर्ती :**

१) सविस्तर निविदा सुचना व इतर सविस्तर माहिती तसेच अटी, शर्ती व शुध्दिपत्रके महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर वरील नमुद कालावधीत पहावयास मिळेल.

कंत्राटदारास निविदेबाबत कोणत्याही प्रकारची विचारणा करावयाची झाल्यास त्यांनी नगर परिषद कार्यालय शेगांव संगणक विभागात कार्यलयीन वेळेत संपर्क करावा.

२) सर्व किंवा कोणतीही निविदा सशर्त नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांनी राखुन ठेवण्यात आले आहे. तसेच अटी व शर्ती शिथील करण्याचे अथवा नव्याने समाविष्ट करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांना राहतील.

३) शासकीय नियमानुसार बिलातुन आयकर, विमा, कामगार उपकर, वस्तू व सेवा कर तसेच

नियमानुसार ईतर आवश्यक कपाती आणि १० टक्के सुरक्षा रक्कम (करारनाम्याच्या वेळेस २% सुरक्षा अनामत व विलातुल 8% सुरक्षा अनामत) कपात करण्यात येईल. कपात केलेली सुरक्षा रक्कम सबंधित कामाचा उणीवांचा कालावधी (Defect liability Period) पूर्ण झाल्यानंतर शासन नियमानुसार अदा करण्यात येईल.

४) उपरोक्त कामांस प्राईज एक्सलेशन (Price Escalation) क्लॉज लागु राहणार नाही.

५) अंदाजपत्रकीय दरापेक्षा अधिक दराची निविदा स्वीकारली जाणार नाही.

६) अंदाजपत्रक दराच्या कमी किमतीच्या निविदाधारकांना सा. बां. वि. शासन निर्णय सीएटी/२०१७/प्र.क्र. ०८/ईमा २ दि. २७/०९/२०१८ व शासन परिपत्रक सा.बां. विभाग सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६/११/२०१८ मधिल तरतुदी बंधनकारक राहतील.

७) कामावरील साहित्याची गुणवत्ता तपासणी शासकीय प्रयोगशाळेमधून करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील तसेच नगर विकास विभाग शासन निर्णय नुसार त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Technical Audit) करून देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. त्याकरिता १०% अतिरिक्त सुरक्षा अनामंत म्हणून देयाकामधून कपात करून घेण्यात येईल. तृतीय पक्ष तांत्रिक लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर अनामत परत करण्यात येईल.

८) कामासंबंधीत कोणताही वाद निर्माण झाल्यास मुख्याधिकारी न.प. शेगांव यांचा निर्णय अंतिम राहील.

९) काम मिळाल्यानंतर, कामाची माहिती व कामापुर्वीचे आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे (Geo Tagged) छायाचित्र कार्यालयास सादर केल्यानंतर देयक अदा करण्यात येईल.

१०) मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे प्रशासकीय मान्यता आदेश जा.क्र.जिनिस/नास्थास्वसं/प्रमा/२८५/ २०२६ दिनांक ३१/०३/२०२५ मधील संपूर्ण अटी व शर्ती लागू राहतील.

११) कामासंबंधीत आवश्यकतेनुस्तर मुदतवाढ देण्याचा अधिकार मुखाधिकारी किंवा नगर परिषद शेगांव सर्वसाधारण सभा यांना राहील. तसेच नेमून दिलेले काम वेळेच्या आत न केल्यास रु. 1000 प्रतिदिवस प्रमाणे दंड आकारण्यात येईल

१२) करारनामा (अटी व शर्ती) शासकीय नियमानुसार निविदा किंमतीनुसार होणाऱ्या रक्कमेच्या मुद्रांक पत्रावर करून देणे अनिवार्य राहील.

१३) काही कंत्राटदार निविदा सादर केल्यानंतर म्हणजेच Bid Lock झाल्यानंतर लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येउ नये असे पत्राद्वारे निविदा समितीस संबंधितास कळवितात त्यामुळे कंत्राटदारचे संगनमत झाले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी संबंधित कंत्राटदाराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात येईल व आर्थिक देकार उघडल्यानंतर कंत्राटदार पात्र ठरल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. जर कंत्राटदाराने काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास

त्याची अनामतरक्कम जप्त करण्यात येईल,

१४) काम करतेवेळी कुठलाही अपघात किंवा जीवित /वित्तीय हानी झाल्यास त्यागी सर्वस्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२०) देखरेख उपकरणांची औ.ई. एम. पूर्व पात्रता

I. भारत सरकार अथवा महाराष्ट्र शासन यांनी वापरास मनाई केलेले साहित्य वापरता येणार नाही.

II. निविदाकाराने ओईएम बाबत चे OEM Authorization प्रमाणपत्र सादर करणे बंधंकारक राहील.

III. सीसीटीव्ही ओईएमकडे ईपीआर नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. [ई-कचरा (व्यवस्थापन) नियम २०२२ च्या नियम ४ आणि ६ अंतर्गत]

IV. तसेच OEM यांचे महाराष्ट्रात कार्यालय/सेवाकेंद्र असणे आवश्यक आहे त्यासाठी आवश्यक ते प्रमाणपत्र जोडणे करणे बंधंकारक राहील.

V. OEM ने प्रमाणपत्र प्रदान करणे आवश्यक आहे की CCTV उत्पादनांचे प्रस्तावित मॉडेल ५ वर्षांच्या कालावधीत अप्रचलित होऊ नये जर ते तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे EOL मिळाले तर OEM समतुल्य किंवा उपलब्ध मॉडेलला समर्थन देईल. (हार्डवेअर व सौफ्टवेअर) GB२८१८१, जीबीटी-२८१११-२०११ माणकांचे समर्थन करीत नसल्याबाबत चे OEM यांच्या लेटरहेड वर जोडाव.

VI. Bidder/OEM should furnish valid certificates for the following systems, Scanned from original copy of ISO Certificates ISO 9001-2015, 14001-2015, ISO 45001-2018, ISO 27001:2013, Certificates असल्यास निविदेसोबत जोडावीत.

VII. OEM लेटरहेडवर वापरात घेण्यात येणाऱ्या उत्पादनाचे अनुपालन प्रमाणपत्र.

XI. कॅमेरा ओ एम कडे सर्व उत्पादनाचे सर्व आवश्यक आयएसओ व आय एस आय / बीआयएस नामांकन असणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही. बीआयएस प्रमाणपत्रासह नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही कॅमेरा OEM ONVIF चा पूर्ण वेळ सदस्य असावा, सीसीटीव्ही OEM कडे सीएमएमआय लेवल ५ किवा त्यापेक्षा जास्त प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. कॅमेरे STQC (Standardization Testing and Quality Certification) प्रमाणित असणे आवश्यक आहेत. या करिता STQC च्या अधिकृत वेबसाइटवर नोंद असणे आवश्यक राहिल.

२१) कामाचे आदेश दिलेल्या दिनांकापासून जास्तीत जास्त ७ दिवसात कंत्राटदाराने काम सुरू करणे बंधनकारक राहील.

२२) निविदाधारकाने कोणताही राजकीय दबाव आणल्यास त्यांची निविदा रद्द करून तसा अहवाल मा. मुख्याधिकारी महोदय यांचेकडे सादर करून त्या कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

२३) सर्व सी.सी.टी.व्ही. व विद्युत साहित्य, अनुषंगिक साहित्य पूरविण्यापूर्वी / बसविण्यापूर्वी त्यांच्या

नमुन्यांची तपासणी संगणक अभियंता यांचे कडून करून घेणे आवश्यक आहे.

२४) मेक इन इंडिया आवश्यक आहे. याच पत्रात हे स्पष्टपणे नमूद केले पाहिजे की या निविदेच्या करार कालावधीसाठी सेवा आणि सुटे भाग उपलब्ध केले जातील तसेच निविदेत उद्धत केलेले मॉडेल तारखे नुसार आणि नवीनतम आहे.

२५) एक किंवा अधिक निविदा कुठलेली कारण न देता नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद शेगांव यांनी राखुन ठेवले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| **संगणक अभियंता** | **लेखापरिक्षक** | स्वा **लेखापाल** | **मा. मुख्याधिकारी** |

Signature Not Verified
Digitally signed by PRAMOD PURNAJI KHARATE
Date: 2026.05.14 10:18:31 IST
Location: Maharashtra-MH